सन २०२६-२७ मध्ये PM-RKVY अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उप अभियान (SMAM) करिता रु.५००.०० कोटी इतक्या निधीच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- कृवपदुम-१९०४५/२६/२०२६-MAG-८-A (E-१६४९६०३)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-३२.

दिनांक : ११ मे, २०२६.

**संदर्भ:-**

१. कृषि विभाग शासन पत्र क्रमांक CSS २०२६/C.R.१९/२-A दिनांक ११.०४.२०२६
२. केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, कृषि व शेतकरी कल्याण विभागाचे पत्र क्र. १-१५/२०२६-RKVY-१९८ दिनांक २२.०४.२०२६
३. कृषि संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय यांचे पत्र क्र. गुनि-५/कृषि यांत्रिकीकरण२८२-र/२०२६, दिनांक २४.०४.२०२६

**प्रस्तावना :**

राज्यात प्रधान मंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना (PM-RKVY) अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. सदर उप अभियानांतर्गत घटकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या निधी हिश्श्याचे प्रमाण ६०:४० असे आहे. केंद्र शासनाने कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) करीता वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.

संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये PM-RKVY च्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील SLSC च्या दिनांक १० एप्रिल, २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त निर्गमित करण्यात आले असून, सदर बैठकीत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) करिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र हिस्सा रु.३००.०० कोटी व त्यासाठीचा अनुरुप राज्य हिस्सा रु.२००.०० कोटी याप्रमाणे एकूण रु.५००.०० कोटी इतक्या निधीच्या वार्षिक कृती आराखडयास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये केंद्र शासनाने कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) करिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सदर एकूण रु.५००.०० कोटी इतक्या निधीच्या वार्षिक कृषि आराखड्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार PM-RKVY अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) या योजनेकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी एकूण रु.५००.०० कोटी इतक्या निधीच्या वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना (PM-RKVY) अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) या योजनेकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र हिस्सा रु.३००.०० कोटी व त्यासाठीचा अनुरुप राज्य हिस्सा रु.२००.०० कोटी याप्रमाणे एकूण रु.५००.०० कोटी निधीच्या वार्षिक कृती आराखडयास खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याबाबतचा प्रवर्गनिहाय (सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती) तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

रुपये कोटीत

| प्रवर्ग | केंद्र | राज्य | एकूण |
|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | २४१.३५ | १६०.९० | ४०२.२५ |
| **अनुसूचित जाती** | ३२.७३ | २१.८२ | ५४.५५ |
| **अनुसूचित जमाती** | २५.९२ | १७.२८ | ४३.२० |
| **एकूण** | ३००.०० | २००.०० | ५००.०० |

२. सदर वार्षिक कृती आराखड्यामधील घटक/उपघटक निहाय मंजूर बाबनिहाय विवरण परिशिष्ट “अ” मध्ये नमूद आहे. सदर अभियानाची केंद्र व राज्याच्या ६०:४० आर्थिक सहभागाच्या प्रमाणात अंमलबजावणी करण्यात यावी.

३. या उप-अभियानाकरीता वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने वार्षिक कृति आराखड्यात मंजूर केलेल्या बाबींवर खर्ची टाकावा तसेच, अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना महा-डीबीटी प्रणालीद्वारे आधारसंलग्न बँक खात्यावर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीव्दारे जमा करावी.

४. सदर योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना (PM-RKVY) अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उप अभियान (SMAM) च्या मार्गदर्शक सूचना, तसेच केंद्र शासनाच्या दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रात नमूद अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. केंद्र शासनाने संदर्भाधीन दि.२३ मार्च, २०२१ च्या ज्ञापनाद्वारे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीच्या सुधारीत कार्यपध्दतीनुसार व संदर्भाधीन दि.०२ ऑगस्ट, २०२१ च्या शासन निर्णयान्वये केंद्र पुरस्कृत योजनांचे निधी वितरण व विनियोग व्यवस्थापनासाठी कृषि यांत्रिकीकरण उपअभियान ही योजना SNA अंकित केली आहे.

६. सदर योजनेंतर्गत उपलब्ध होणारा निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनूसरून सर्व वित्तीय कायदे/प्रक्रियाचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादे/C.V.C. तत्वानुसार/ प्रचलित शासन निर्णय/ नियम/ परिपत्रक/तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कर्यालयाची राहील.

७. कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी, कृषि संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्तालय यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन उदिष्टनिहाय अंमलबजावणी विषयक सविस्तर सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे या योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगतीचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखे पर्यंत केंद्र शासनास सादर करावा.

८. सदर अभियानाच्या अंमलबजावणीकरीता केंद्र व राज्य हिस्स्याचा निधी प्रवर्गनिहाय ६०:४० प्रमाणात वेळोवेळी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे आयुक्त (कृषि) यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर निधी केंद्र व राज्य हिस्स्याच्या पुढील लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|
| **सर्वसाधारण प्रवर्ग** | मागणी क्रमाक:- डी-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००)११३-कृषि अभियांत्रिकी<br>(००) (०८) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो.),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१२५१३)<br>३३ अर्थसहाय्य | मागणी क्रमाक:- डी-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००)११३-कृषि अभियांत्रिकी<br>(००) (१६) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो.),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१८७३६)<br>३३ अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जाती** | मागणी क्रमाक : एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७८९ अनुसूचित जाती उप योजना<br>(०१) (११) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो.),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१बी१८८)<br>३३ अर्थसहाय्य | मागणी क्रमाक : एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७८९ अनुसूचित जाती उप योजना<br>(०१) (१२) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो.),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१बी१९७)<br>३३ अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जमाती** | मागणी क्रमाक : टी-५<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७९६ जनजाती उप योजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उप योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना,<br>(०१) (११) कृषी उन्त्ती योजना कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो.),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ए४५९),<br>३३ अर्थसहाय्य | मागणी क्रमाक : टी-५<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७९६ जनजाती उप योजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उप योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना,<br>(०१) (१०) कृषी उन्त्ती योजना कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो.),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ए४४१),<br>३३ अर्थसहाय्य |

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१११५४३३२२९०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2026.05.11 15:46:02 +05'30'

**( भुपेश अ. कोळी )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१. मा. मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२.
३. अ.मु.स.(वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
४. अ.मु.स.(नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
५. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
६. सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग), मंत्रालय,मुंबई-३२.
७. सचिव (आदिवासी विकास विभाग), मंत्रालय,मुंबई-३२.
८. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व संचालक/सह संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
१०.विभागीय कृषि सह संचालक (सर्व).
११.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व).
१२.महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता).
१३.माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१४.नियोजन विभाग (का-१४३१) मंत्रालय, मुंबई-३२.
१५.वित्त विभाग ( व्यय-१ व अर्थसंकल्प - १३) मंत्रालय, मुंबई- ३२.
१६.निवड नस्ती (कार्यासन -८ अे).

शासन निर्णय क्र. कृवपदुम-१९०४५/२३/२०२६-MAG-८-A (E-१६३६७६४), दि.११ मे, २०२६ सोबतचे

## परिशिष्ट -अ

(रुपये कोटीत)

| अ.क्र | घटक | केंद्र हिस्सा (६०%) | राज्य हिस्सा (४०%) | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | यंत्र/औजारांचे खरेदीसाठी अर्थसहाय्य | २०७.०० | १३८.०० | ३४५.०० |
| २ | सेवा सुविधा केंद्र (CHC) स्थापनेसाठी अर्थसहाय्य | ७८.०० | ५२.०० | १३०.०० |
| ३ | Flexi Fund | १२.०० | ८.०० | २०.०० |
| ४ | प्रशासकीय खर्च | ३.०० | २.०० | ०५.०० |
| | एकुण | ३००.०० | २००.०० | ५००.०० |

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2026.05.11 15:46:22 +05'30'

( भुपेश अ. कोळी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन